**पुणे -** सकाळ करंडक आंतरमहाविद्‍यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेत पुणे विभागातून इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स आणि सायन्सच्या "म्होरक्‍या' एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकाविला. पुणे विद्‍यार्थी गृह अभियांत्रिकी महाविद्‍यालयाची "षांढिल्य' आणि आबासाहेब गरवारे महाविद्‍यालय संघ क्रमांक एकची "वीसचं गणित' या एकांकिका संयुक्तपणे द्‍वितीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या.



पुणे विभागातून हे तीन संघ एक ते तीन फेब्रुवारी या कालावधीत बालगंधर्व रंगमंदिर येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत; तर मॉडर्न महाविद्‍यालयाची "बॉइज' एकांकिकेला तृतीय क्रमांक मिळाला. टाळ्या-शिट्ट्या... "आवाज कुणाचा', "थ्री चिअर्स फॉर', "अररं रं घुमतंय काय', "बक्षीस कुणाला' अशा घोषणांचा निनाद... अशा सळसळत्या तरुणाईच्या जल्लोषात स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील विजेत्या संघांना प्रसिद्ध अभिनेते-लेखक आणि दिग्दर्शक गिरीश जोशी यांच्या हस्ते सोमवारी पारितोषिके प्रदान करण्यात आली. "सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये, स्पर्धेचे प्रायोजक असलेल्या "सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्‍यूट'चे कार्यकारी संचालक संजय चोरडिया, "महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'च्या नियामक मंडळाचे सदस्य ऍड. सुशील निमकर, "चॉइस फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्‍यूट'चे विवेक वाघ, "समन्वय'चे आशुतोष परांडकर, स्पर्धेचे परीक्षक प्रा. केशव देशपांडे, शोभा बोल्ली, सतीश देशमुख आणि "सकाळ'च्या मासिके विभागाचे प्रमुख विजय सबनीस या वेळी उपस्थित होते.

जोशी म्हणाले, ""मुंबईतील स्पर्धांमध्ये लेखक, तंत्रज्ञ आणि दिग्दर्शक बाहेरचे असले तरी चालतात. महाविद्‍यालयीन स्पर्धेतील एकांकिकांचे लेखक, तंत्रज्ञ आणि दिग्दर्शक विद्‍यार्थीच असले पाहिजेत, हा पुण्यातील स्पर्धांचा नियम आहे. त्यामुळे विद्‍यार्थ्यांना नवनवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळते आणि पुण्यातील विद्‍यार्थी तांत्रिक बाबींमध्ये उजवे असतात. आता

मागणी वाढली असल्यामुळे पुरेशी स्पर्धा न करताच एखाद्या पारितोषिकाच्या जोरावर युवा कलाकाराला मोठ्या संधी मिळतात. अशा कलाकारांचे काय होते ते दूरचित्रवाणी पाहिली की समजते."

पाध्ये म्हणाले, ""सकाळ करंडक या उपक्रमाला चढत्या भाजणीने प्रतिसाद मिळत आहे. पुणे विभागातून यंदा 65 संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धक संघांमध्ये चुरस व्हावी, या उद्देशातून नगरमधील संघांना नाशिक विभागात, बारामतीतील संघांना सोलापूर विभागात आणि साताऱ्यातील संघांना कोल्हापूर विभागात समावेश देण्यात आला. नाटक या प्रकारात सामंजस्याची, एकत्रितपणे काम करण्याची आणि परस्परांना समजून घेण्याची भावना वाढीस लागते. पडेल ते काम करणाऱ्यांनाच यश मिळते."

चोरडिया म्हणाले, ""विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही स्पर्धा उपयुक्त आहे."

परीक्षकांच्या वतीने देशमुख म्हणाले, ""परीक्षणामध्ये कलाकारांची मेहनत, एकाग्रता याला महत्त्व दिले आहे. या स्पर्धेच्यानिमित्ताने तरुणाईमध्ये असलेल्या चैतन्याची जाणीव झाली." राज काझी यांनी सूत्रसंचालन केले.

"सकाळ करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धे'ची अंतिम फेरी एक ते तीन फेब्रुवारी या कालावधीत बालगंधर्व रंगमंदिर येथे.
अंतिम फेरीसाठी "चॉईस फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट'तर्फे प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध.
अंतिम फेरीतील विजेत्या आणि स्पर्धेतील निवडक उल्लेखनीय एकांकिकांचे "साम मराठी' वाहिनीवरून प्रसारण.
"सकाळ' आणि "क्लब वसुंधरा'तर्फे 14 ते 21 फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या "वसुंधरा महोत्सवा'त पथनाट्यामध्ये सहभागाची संधी.

**द्वितीय** ः स्वप्नील काटे-म्होरक्या-इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स

**द्वितीय** ः मोहित जट्टे-म्होरक्या-सत्या, (स्त्री) प्रियांका मुनेश्वर-म्होरक्या-तान्ही (दोघेही इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स)

**उत्तेजनार्थ** ः स्वप्नील काटे-म्होरक्या-इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स

**प्रकाशयोजना सर्वोत्कृष्ट** ः नयुम शेख, कार्तिक शेटे-म्होरक्या-इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स

**संगीत सर्वोत्कृष्ट** ः अजिंक्य कोकीळ, अजिंक्य मोहिते-म्होरक्या-इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स